# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८
## मा.महापालिका सभा
## कार्यपत्रिका क्रमांक -४४
## सभावृत्तांत

दिनांक :- २०.०३.२०१० वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मार्च-२०१० ची मासीक मा.महापालिका सभा शनिवार दि.२०.०३.२०१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बहल योगेश मंगलसेन - महापौर
२. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ
३. मा.भालेकर शांताराम कोंडीबा
४. मा.घुले रघुनंदन रामभाऊ
५. मा.जाधव विजया अशोक (मामी)
६. मा.थोरात एकनाथ दादा
७. मा.दत्तात्रय बाबुराव साने
८. मा.सौ.अलकाताई बाळासाहेब यादव
९. मा.लोखंडे सुजाता सुनिल
१०.मा.बो-हाडे शरद परशुराम
११.मा.आल्हाट शांता महेंद्र
१२.मा.डॉ. सौ. मीना पाटील
१३.मा.कुंभार रामदास तानाजी
१४.मा.सौ.सारिकाताई संतोषभाऊ लांडगे
१५.मा.गवळी विजया पंडित
१६.मा.अजित दामोदर गव्हाणे
१७.मा.महेश किसन लांडगे
१८.मा.फुगे सुनंदाताई विजय
१९.मा.आशा अंकुश लांडगे
२०.मा.मोहिनी विलास लांडे
२१.मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर
२२.मा.सौ. वर्षा विलास मडीगेरी
२३.मा.सावळे सिमा
२४.मा.ननावरे जितेंद्र बाबासाहेब
२५.मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर

२६.मा.राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले
२७.मा.भोसले हनुमंतराव भिमराव
२८.मा.यशवंत भोसले
२९.मा.कदम निर्मला सदगुरु
३०.मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश
३१.मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार
३२.मा.काळूराम मारुती पवार
३३.मा.आझम फकीरभाई पानसरे
३४.मा.श्री.बाबर प्रकाश धरमसी
३५.मा.भापकर मारुती साहेबराव
३६.मा.शेट्टी जगदिश
३७.मा.सौ. मंगलाताई अशोक कदम
३८.मा.बोबडे  भिमा सखाराम
३९.मा.उबाळे सुलभा रामभाऊ
४०.मा.गवळी शशीकिरण
४१.मा.तानाजी विठ्ठल खाडे
४२.मा.उबाळे वैशाली संजय
४३.मा.सुमनताई  मधुकर पवळे
४४.मा.कुमार आर. एस.
४५.मा.सौ. नंदा विकास ताकवणे
४६.मा.उल्हास शेट्टी
४७.मा.जावेद शेख
४८.मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती
४९.मा.कुटे गोपाळ नाना
५०.मा.शरद उर्फ राजू मिसाळ
५१.मा.भोंडवे तुकाराम महादू
५२.मा.गणेश तुकाराम भोंडवे
५३.मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव
५४.मा.वाघ रघुनाथ दलपत
५५.मा.सौ. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
५६.मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर
५७.मा.आण्णा दादू बनसोडे
५८.मा.तिकोने हरिभाऊ किसन
५९.मा.बाराहाते शरद भगवंतराव

६०.मा.अपर्णा निलेश डोके
६१.मा.गावडे  जयश्री वसंत
६२.मा.साबळे  जगन्नाथ दगडू
६३.मा.गुरुबक्ष किसनदास पहलानी
६४.मा.रामआधार धारिया
६५.मा. ॲड. अमर साधूराम मुलचंदानी
६६.मा.सौ.वाघेरे उषा संजोग
६७.मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
६८.मा.विठ्ठल ऊर्फ नाना काटे
६९.मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे
७०.मा.भाऊ उर्फ  कैलास गबाजी थोपटे
७१.मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब
७२.मा.भारती ज्योती सुखलाल
७३.मा.कोकणे संतोष अंकुश
७४.मा.सुतार विजया विजय
७५.मा.दरेकर सतीश दगडू
७६.मा.आण्णा ऊर्फ मनोहर पवार
७७.मा.बारणे संतोष नागु
७८.मा.बारणे श्रीरंग चंदु ऊर्फ आप्पा
७९.मा.कलाटे कमल तानाजी
८०.मा.आदियाल (शीख) शोभा गुरुमितसिंग
८१.मा.सौ. नांदगुडे सुजाता विलास
८२.मा.खोमणे लता हनुमंत
८३.मा.प्रशांत शितोळे
८४.मा.ढोरे उषा ऊर्फ माई मनोहर
८५.मा.अशोकभाई सोनवणे
८६.मा.साळुंखे सुरेखा मारुती
८७.मा.सौ. जगताप कल्पना कैलास
८८.मा.जगताप शंकर पांडुरंग
८९.मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
९०.मा.सौ. गावडे सुषमा गोविंद
९१.मा.गायकवाड सुरदास तुकाराम
९२.मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
९३.मा. उत्तम मुक्ताजी हिरवे

९४.मा. विनायक सुरेश रणसुभे
९५.मा. प्रेमकुमार शंकरन नायर ऊर्फ बाबू नायर
९६.मा. एकनाथ रावसाहेब पवार

याशिवाय मा.आशिष शर्मा-महापालिका आयुक्त, मा.डुंबरे-अति.आयुक्त, मा.देशमुख, मा.मुंढे, मा.गायकवाड, मा.फडणीस-सहा. आयुक्त, मा.काळे-नगरसचिव, मा.उगिले-शहर अभियंता, मा.सुरगूडे-विकास अभियंता, मा.चव्हाण-अति.शहर अभियंता, मा.लोंढे-मुख्य लेखापाल, मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.अय्यर-वैद्य.संचालक, मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्य.) व मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------------------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.महापालिका सभा क्र.४३ दि.१५/०२/२०१० [दु.२:०० व ३:१५] व २०/२/२०१० चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------------------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १

दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भुजि/६/कावि/६०७/०९ दि.१२/०८/२००९
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८९६८ दिनांक १८.८.०९
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.८०७ दि.१५/०२/२०१० अन्वये

पिंपरी चिंचवड मनपा परिवहन उपक्रमाकरिता आरक्षित असलेल्या तसेच मनपाच्या ताब्यात असलेल्या जागा/विकसीत मालमत्ता पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.यांना हस्तांतरण करणेकामी प्रस्तावात नमुद जागा/मालमत्ता यांचे चालू बाजारभावा प्रमाणे किंमत निश्चिती साठी बराच कालावधी लागणार आहे तथापि अध्यक्ष व व्यवस्थापक संचालक पी एम पी एम एल यांची दि.२४/४/०९ व १२/५/०९ चे पत्रान्वये जागा/मालमत्ता मागणी विचारात घेता प्रस्तावात नमुद प्रमाणेचे क्र.१ ते ६ मधील आरक्षित जागा विकसित केलेल्या मालमत्ता या प्रस्तावात नमुद प्रमाणेचे अट क्र. १ ते ११ अटीनुसार तसेच दि.१९/४/०७ रोजीचे शासन निर्णय प्रमाणे नियोजित कंपनी पी एम पी एम एल यांना चालू बाजार भाव नुसार मा.उपसंचालक नगररचना

निश्चित करतील त्या मुल्यांकनास/किंमतीस अधिन राहून प्रस्तावा प्रमाणेच्या १ ते ६ मधील मनपा मालकीच्या व दिर्घ मुदत कराररनामा व्दारे ताब्यात आलेल्या जागा/मालमत्ता कायद्याचे कलम ७९ (क) अन्वये तसेच परिवहन उपक्रमासाठी आरक्षित असलेल्या इतर मनपा मिळकती प्रस्तावा प्रमाणेचे मनपा अटीनुसार पी एम पी एम एल नावे हस्तांतर करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.अजित गव्हाणे :- सूचनेला अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८२८ विषय क्रमांक :- १
दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भुजि/६/कावि/६०७/०९ दि.१२/०८/२००९
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८९६८ दिनांक १८.८.०९
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.८०७ दि.१५/०२/२०१० अन्वये

विषय क्रमांक १ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल- ६० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- २
दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१अ/कावि/७६३/०९ दि.८/१२/०९
२) मा.विधी समिती सभा दिनांक १/१/२०१० ठराव क्र.२३३

३) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०२१२ दिनांक १६/१/२०१०
४) मा.महापालिका सभा ठराव क्र.८०८ दि.१५/०२/२०१० अन्वये

स्थापत्य विभागाकडील "असिस्टंट ट्रान्सपोर्ट प्लॅनर" पदाची आवश्यकता विचारात घेता, महापालिका आस्थापनेवरील सदर पदाची - "वेतनश्रेणी : र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन ५४०० भरतीप्रमाण : १००% सरळसेवेने शैक्षणिक अर्हता : १)स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी B.E. [civil] २)महापालिकेतील अभियांत्रिकी पदाचा किमान ५ वर्षाचा अनुभव ३) ट्रान्सपोर्टेशन इंजिनिअरींग मधील पदवीव्युत्तर पदवी असणे आवश्यक ४) ट्रान्सपोर्टेशन इंजिनिअरिंग मधील कामाचा अनुभव असणे आवश्यक", याप्रमाणे वेतनश्रेणी व शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक असल्याने त्याप्रमाणे बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.अजित गव्हाणे :- सूचनेला अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- ८२९ विषय क्रमांक :- २
दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१अ/कावि/७६३/०९ दि.८/१२/०९
२) मा.विधी समिती सभा दिनांक १/१/२०१० ठराव क्र.२३३
३) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०२१२ दिनांक १६/१/२०१०
४) मा.महापालिका सभा ठराव क्र.८०८ दि.१५/०२/२०१० अन्वये

विषय क्रमांक २चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-६० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ३

दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.एकनाथ मोटे, मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव...
२) मा.विधी समिती सभा दिनांक १/१/२०१० ठराव क्र.२४४
३)मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०२१३ दिनांक १६/१/२०१०
४)मा.महापालिका सभा ठराव क्र.८०९ दि.१५/०२/२०१० अन्वये

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये पर्यावरण संवर्धन व प्रदुषण नियंत्रणाकरीता पर्यावरण विभाग कार्यरत आहे. ७४ वी भारताची घटनेची दुरुस्ती नुसार पर्यावरण संरक्षणासाठी सध्या केंद्रशासन व महाराष्ट्रशासनाकडुन विशेष प्राधान्य दिले आहे. त्या आधारे मा.आयुक्त यांच्या आदेश क्र.प्रशा/१/कावि/१३१३/२००९ दि.१६/११/२००९ अन्वये पर्यावरण अभियांत्रिकी कक्ष स्थापन झाला आहे. सदर कक्षाचे कामकाज कार्यक्षमतेने पार पाडण्याकरिता पर्यावरण संवर्धन अधिकारी म्हणुन कामकाजाची जबाबदारी असणा-या सक्षम अधिका-याची नितांत आवश्यकता आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण/१००५/वर्गीकरण/प्रक्र/३७९/०५/नावि२४ मंत्रालय मुंबई दि.०४/०५/२००६ नुसार परिशिष्ट २ मधील अनुक्रमांक २९ अन्वये पर्यावरण संवर्धन अधिकारी हे पद निर्माण करणे महानगरपालिकेवर बंधनकारक आहे. सदर शासन निर्णयानुसार पुणे व कोल्हापुर महानगरपालिका यांनी पर्यावरण संवर्धन अधिकारी हे पद निर्माण करुन भरले आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यकारी अभियंता (पर्यावरण) तथा पर्यावरण संवर्धन अधिकारी या अभिनामाचे पद निर्माण करावे व त्याची वेतनश्रेणी, शैक्षणिक अर्हता, अनुभव, पात्रता व पद भरावयाची पध्दत सोबतचे प्रपत्र अ प्रमाणे ठेवावी. सदर कार्यकारी अभियंता (पर्यावरण) तथा पर्यावरण संवर्धन अधिकारी या अभिनामाचे पद निर्माण करण्यास व भरण्यास मान्यता देणेत यावी त्याचप्रमाणे मनपा अधिनियमातील सुधारणा सन २००८ - ०९ अंतर्गत स्ट्रक्चरल ऑडीट करणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी स्ट्रक्चरल इंजिनियरींग मधील अर्हता (शैक्षणिक अर्हता एम.टेक [सिव्हील स्ट्रक्चरल इंजिनियरिंग]) प्राप्त असलेल्या मनपातील अनुभवी व पात्र उमेदवाराची स्ट्रक्चरल डिझाईनर अथवा स्ट्रक्चरल ऑडिटर म्हणून नेमणुक र.रु.१५६००- ३९४०० ग्रेड पे ५४०० अन्वये करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, महापालिका सभेमध्ये या ठरावाला मान्यता दिलेली आहे. मा.महापालिका सभेच्या यापूर्वीच्या ठरावाची अंमलबजावणी अपेक्षित असल्याने विषय क्रमांक ३ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.उल्हास शेट्टी :- सूचनेला अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :-८३० विषय क्रमांक :- ३
दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.एकनाथ मोटे, मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव...
२) मा.विधी समिती सभा दिनांक १/१/२०१० ठराव क्र.२४४
३)मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०२१३ दिनांक १६/१/२०१०
४)मा.महापालिका सभा ठराव क्र.८०९ दि.१५/०२/२०१० अन्वये

मा.महापालिका सभेच्या यापूर्वीच्या ठरावाची अंमलबजावणी अपेक्षित असल्याने विषय क्रमांक ३ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल-६० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :-८३१ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.अग्नि/१/कावि/३१/१० दि.४/२/२०१०
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०६४९ दिनांक १८.२.२०१०

मा.महापालिका सभा ठराव क्र.५३४० दि.२०/११/२००४ अन्वये लागू करणेत आलेल्या अग्निशमन सेवा शुल्कांमध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करून घेणे व नवीन बाबींवर अग्निशमन सेवाशुल्क दरवाढ आकारणे यासाठी प्रस्तावासोबतच्या सुचीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, अग्निशामक संदर्भात हा विषय आहे. इमारतींच्या बांधकामाच्या उंचीला ३६ मी. पर्यंत परवानगी दिलेली आहे. त्यामुळे अग्निशामक विभागही तेवढाच सक्षम असला पाहीजे. मागील कालावधीत अग्निशामक विभागाकडून गाड्या खरेदी केल्या गेल्या. त्यानंतर पुन्हा खरेदी झाली नाही. भ्रष्ट्राचार झाला, चुकीची कामे झाली, गैरव्यवहार झाला. याच गाड्या आपण आज वापरतो आहोत. १८ मी. ऐवजी ३६ मी. उंचीच्या इमारतींना परवानगी देतो आहोत. आज शहरात मोठ्या प्रमाणात उंच इमारती होत आहेत. भोसरी,थेरगाव,सांगवी, शहराच्या मध्यवर्ती भागात मोठमोठ्या इमारती,मॉल्स् होत असताना नागरीकरणात प्रचंड वाढ होत असताना अग्निशामक विभाग तेवढाच सक्षम असणे गरजेचे आहे. तो पहिला केला पाहीजे.

मा.महापौर :- आपण ७० मी. उंचीपर्यंत इमारतींना परवानगी देण्याची तयारी केली आहे. आपण सांगितल्याप्रमाणे किंमतीत कॉम्प्रमाईज न करता मॉडर्न इक्विपमेंट घेऊन अतिशय सुसज्ज असे अग्निशामक दल करावे. ७० मी. उंचीपर्यंत इमारतींना परवानगी मिळणार आहे त्याअनुषंगाने तयारी करावी. शासनाच्या निधीची मदत घेऊन हे करावे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-६०　　　　　　　　　　प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :-८३२　　　　　　　　विषय क्रमांक :- ५
दिनांक :- २०.३.२०१०　　　　　　　विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वायसीएमएच/ॲकॅड/कावि /३२/१० दि.८/२/२०१०
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०६७० दिनांक १८.२.२०१०

यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाची गरज विचारात घेऊन डॉ.जे.एस. महाजन-सर्जन यांस दि.६/३/२००९ ते ३१/१/२०११ या कालावधीकरीता मानसेवी विशेषज्ञ म्हणून नेमणूक देणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-६० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ६

दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/७/२०१० दि.४/२/२०१०

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२५९ दिनांक ५.२.२०१०

टि.डी.आर. बाबतचे दि. ३ फेब्रुवारी २००७ रोजीचे शासननिदेश व त्यानुषंगाने नगर विकास विभागाकडील दि. १६/८/२००७ रोजीचे मार्गदर्शन याचा साकल्याने विचार करता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेबरोबर केलेल्या लेखी करार असल्यास कराराचे तारखेपासून किंवा महापालिकेची सुधारित मंजूर विकास योजना आराखडयाच्या मंजूरी दिनांकापासून म्हणजेच दि.१८ सप्टेंबर १९९५ पासून जमिन मालकांना कोणताही मोबदला न देता प्रत्यक्षात त्यांच्या ताब्यात असलेल्या जागेवर

रस्ते व आरक्षणे इ. विकास कामे केलेली आहेत अशा सर्व संबंधितांना महानगरपालिकेच्या नावे नोंदणीकृत हस्तांतर दस्त लिहून दिल्यास नियमाप्रमाणे होणारा मोबदला एफ.एस.आय./टि.डी.आर.च्या स्वरुपात देणेकामी व त्याप्रमाणे प्रस्तावासोबत जोडलेल्या प्रपत्र अ व प्रपत्र ब प्रमाणे विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बदल करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.श्रीरंग बारणे :- सुचनेला अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :-८३३ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/७/२०१० दि.४/२/२०१०
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२५९ दिनांक ५.२.२०१०

विषय क्रमांक ६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-६० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ७
दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/वि.नि.नि./०८/२०१० दि.०४/०२/२०१०
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२६० दिनांक ५.२.२०१०

मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आरक्षित जागेच्या सभोवताली असलेल्या वापराचे वर्गीकरण विचारात घेऊन विकास हक्क हस्तांतरणासाठी (टि.डी.आर.) अनुज्ञेय करावयाचा चटई क्षेत्र निर्देशांक किती असावा हे प्रस्तावासोबतच्या तक्त्यात नमूद करण्यात आलेले असुन त्यानुसार म.प्रा.व न.रा.अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नियम क्र. N.**2.4.5** मध्ये बदल करणेसाठी/तरतुदी नव्याने समाविष्ट करणेसाठी पुढील प्रमाणे फेरबदल प्रस्तावीत करण्यात आला असुन- " N.**2.4.5-** The builtup area for the purpose of F.S.I. credit in the DRC shall be equal to the gross of the reserved plot to be surrendered & will proportionately increase or decrease according to the permissible FSI of the Zone where from the TDR has originated and more particularly mentioned in Table No.**31**", त्यानुसार सदरचे नियम विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समाविष्ट करण्याच्या फेरबदलास म.प्रा. व न.रा. अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.श्रीरंग बारणे :- सुचनेला अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :-८३४ विषय क्रमांक :- ७
दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/वि.नि. नि./०८/२०१० दि.०४/०२/२०१०
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२६० दिनांक ५.२.२०१०

विषय क्रमांक ७चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-६० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ८

दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.सिध्देश्वर बारणे मा.अख्तरहुसेन चौधरी यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२६२ दिनांक ५.२.२०१०

"नागरीकांना पायाभुत सुविधा देणेसाठी विविध विकास कामे सुरु आहेत. विकास कामांमध्ये मोठे रस्ते,पुल,इमारती इ.चा समावेश आहे. सदर कामांचे संकल्पचित्र (Structural Design) म.न.पा.स इतर मान्यता प्राप्त स्ट्रक्चरल डिझ ाायनर यांचे मार्फत करुन घ्यावे लागते. सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई प्रादेशिक विकास महामंडळ इ. ठिकाणी प्रकल्पाच्या संकल्पचित्राची पुर्नतपासणी केली जाते. जेणेकरुन डिझाईनमध्ये चुका अथवा त्रुटी राहणार नाही. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग,महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,मुंबई प्रादेशिक विकास महामंडळ इ. ठिकाणी प्रकल्पाच्या संकल्पचित्राची तपासणी करणेसाठी प्रुफ कन्सल्टंट याची नेमणूक केली जाते. त्यासाठी मनपातीलच पात्र उमेदवारास सदरचे काम करणेसाठी संधी द्यावी असे वाटते. मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमात सन २००८-२००९ मध्ये केलेल्या सुधारणाप्रमाणे म.न.पा.तर्फे होत असलेल्या सर्व विकास कामांचे स्ट्रक्चरल ऑडीट होणे अत्यावश्यक व बंधनकारक आहे. त्यानुसार म.न.पा. चे प्रकल्प आणि म.न.पा.कार्यक्षेत्रात असणा-या खाजगी मालमत्ता,सोसायटया यांचेही स्ट्रक्चरल ऑडिट करणे अत्यावश्यक आहे. इतर महापालिकांमध्ये याबाबत कार्यवाही सुरु आहे. त्यासाठी स्ट्रक्चरल डिझायनर या पदाची आवश्यक लक्षात धेता, स्ट्रक्चरल डिझायनर या पदासाठी मान्यता देऊन महापालिका आस्थापनेवरील मनपातील स्ट्रक्चरल डिझाईन या क्षेत्रातील पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या व्यक्तीची नेमणूक करावी. त्यासाठी (१) स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी (B.E.Civil) (२) महापालिकेमधील कामाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. (३) स्ट्रक्चरल इंजिनिअरींगमधील पदव्युत्तर अभ्यासक्रम म्हणजेच एम.टेक. सिव्हील-स्ट्रक्चरल इंजिनिअरींग अशी शैक्षणिक अर्हता असणे व त्यातील अनुभव असणे आवश्यक आहे. (४) Insititution

Of Engineers- India यांचेकडील Chartered Engineer (सनदी अभियंता) प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे,याप्रमाणे म.न.पा.आस्थापनेवरील पात्र उमेदवार

श्री.अजय सदाशिव नहिरे यांची स्ट्रक्चरल डिझायनर या पदासाठी र.रु. १५६००-३९१००, ग्रेड वेतन ५४०० या वेतनश्रेणीत नेमणूक करावी", असा प्रस्ताव ठेवणेत आला आहे त्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

भारतीय प्रजासत्ताकाच्या सुवर्ण महोत्सव वर्षानिमित्त म.न.पा. मुख्य शासकिय इमारतीच्या दर्शनी भागात तसेच यशवंतराव सभागृहात भारतीय संविधानाची प्रस्ताविका (सरनामा) भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १४ एप्रिल २०१० जयंतीचे औचित्य साधून बसविण्यास मान्यता देणेत यावी.

मा.अशोकभाई सोनावणे :- मा.महापौर साहेब,उपसुचनेला अनुमोदन देतो.

मा.राजेंद्र साळुंके :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

पिंपरी चिचवड महानगरपालिकेचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय ७५० बेडस् असलेले मल्टीडिसिप्लेनरी, पब्लिक हॉस्पीटल कार्यरत आहे. आरोग्य सेवा अंतर्गत रुग्णालयीन सेवत म.न.पा.परिसर तसेच जवळपासचे सर्व जिल्हयामधुन या ठिकाणी दररोज हजारो रुग्ण औषध उपचार घेत आहेत. रुग्णालयात बाहय रुग्ण विभागामध्ये ८ओ.पी.डी.,१५अंतररुग्ण विभाग, ८ऑपरेशन थिएटर असलेले शस्त्रक्रिया संकुल, **ECU,SDICU,NICU**, डायलिसीस विभाग, कॅन्सर विभाग, कृत्रिम अवयव विभाग, औषधवाटप विभाग, तातडीक औषध वाटप विभाग, रुग्णालय औषध भांडार, रुग्णालय भांडार, बायोमेडिकल विभाग इत्यादी कार्यरत आहेत. या सर्व विभागांना रुग्णालय औषध भांडारामार्फत दैनंदिन आवश्यक लागणारे औषधे /साहित्य, लॅब केमिकल्स, एक्स रे फिल्मस्, डेंटल साहित्य व इतर यांचा पुरवठा केला जातो. दिवसेंदिवस रुग्ण संख्या वाढत असल्याने रुग्णास लागणारे औषध/साहित्य, प्रयोगशाळा केमिकल्स,एक्स रे फिल्मस् व इतर साहित्य यांची मागणी, खरेदी,वाटप इत्यादी कामकाजाचा व्याप वाढलेला आहे. परिणामी या रुग्णालयाचे औषध भांडारामध्ये व्यवस्थापक या पदाची नितांत आवश्यकता भासत आहे. या सर्व बाबी विचारात घेता वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये सुध्दा औषध भांडार आहे. तेथील कामकाजाचा व्याप हा मध्यवर्ती औषध भांडारातील "व्यवस्थापक मध्यवर्ती औषध

भांडार” यांच्या पदाइतकाच महत्वाचा व जबाबदारीचा झालेला आहे. वाय.सी.एम. रुग्णालयातील सर्व विभागांना योग्य रितीने व तत्परतेने औषधे /साहित्य यांची व्यवस्था होण्यासाठी अनुभवी व्यवस्थापक असण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. रुग्णालयीन कामकाजाच्या व्यवस्थापनाच्या दृष्टिने महानगरपालिकेचे आस्थापनेवरील फार्मासिस्ट पे बँड र.रु.९३००-३४८०० ग्रेड वेतन ४२०० या संवर्गाचे एका पदाची श्रेणीवाढ करुन “व्यवस्थापक औषध भांडार,वाय.सी.एम.रुग्णालय” या अभिनामाचे एक पद

१. एस.एस.सी.किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण
२. वैद्यकीय महाविद्यालयातील फार्मसीमधील पदविकाधारक
३. किमान २५० बेडस् असलेल्या रुग्णालयाचे औषध भांडारातील सर्व कामकाजाचा किमान १० वर्ष अनुभव

याप्रमाणे अर्हता निश्चित करुन पे बँड र.रु.९३००-३४८००,ग्रेड वेतन ४४०० या वेतनश्रेणीमध्ये निर्माण करुन फार्मासिस्ट या पदावरील कर्मचाऱ्यांमधुन पदोन्नतीने भरणेस मान्यता देणेत यावी.

मा.शंकर जगताप :- मा.महापौर साहेब, उपसुचनेला अनुमोदन देतो.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, मा.राजेंद्र साळुंके व मा.शंकर जगताप यांनी, मा.मारुती भापकर व मा.अशोक सोनावणे यांनी मांडलेली उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनाप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८३५ विषय क्रमांक :- ८
दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.सिध्देश्वर बारणे मा.अख्तरहुसेन चौधरी यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२६२ दिनांक ५.२.२०१०

“नागरीकांना पायाभुत सुविधा देणेसाठी विविध विकास कामे सुरु आहेत. विकास कामांमध्ये मोठे रस्ते,पुल,इमारती इ.चा समावेश आहे. सदर कामांचे संकल्पचित्र (Structural Design) म.न.पा.स इतर मान्यता प्राप्त स्ट्रक्चरल डिझ ाायनर यांचे मार्फत करुन घ्यावे लागते. सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई प्रादेशिक विकास महामंडळ इ. ठिकाणी प्रकल्पाच्या संकल्पचित्राची पुर्नतपासणी केली जाते. जेणेकरुन डिझ

ाईनमध्ये चुका अथवा त्रुटी राहणार नाही. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग,महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,मुंबई प्रादेशिक विकास महामंडळ इ. ठिकाणी प्रकल्पाच्या संकल्पचित्राची तपासणी करणेसाठी प्रुफ कन्सल्टंट याची नेमणूक केली जाते. त्यासाठी मनपातीलच पात्र उमेदवारास सदरचे काम करणेसाठी संधी द्यावी असे वाटते. मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमात सन २००८-२००९ मध्ये केलेल्या सुधारणाप्रमाणे म.न.पा.तर्फे होत असलेल्या सर्व विकास कामांचे स्ट्रक्चरल ऑडीट होणे अत्यावश्यक व बंधनकारक आहे. त्यानुसार म.न.पा. चे प्रकल्प आणि म.न.पा.कार्यक्षेत्रात असणा-या खाजगी मालमत्ता, सोसायटया यांचेही स्ट्रक्चरल ऑडिट करणे अत्यावश्यक आहे.इतर महापालिकांमध्ये याबाबत कार्यवाही सुरु आहे. त्यासाठी स्ट्रक्चरल डिझायनर या पदाची आवश्यक लक्षात धेता, स्ट्रक्चरल डिझायनर या पदासाठी मान्यता देऊन महापालिका आस्थापनेवरील मनपातील स्ट्रक्चरल डिझाईन या क्षेत्रातील पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या व्यक्तीची नेमणूक करावी. त्यासाठी (१) स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी (B.E.Civil) (२) महापालिकेमधील कामाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. (३) स्ट्रक्चरल इंजिनिअरींगमधील पदव्युत्तर अभ्यासक्रम म्हणजेच एम.टेक. सिव्हील-स्ट्रक्चरल इंजिनिअरींग अशी शैक्षणिक अर्हता असणे व त्यातील अनुभव असणे आवश्यक आहे. (४) Insititution Of Engineers- India यांचेकडील Chartered Engineer (सनदी अभियंता) प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे,याप्रमाणे म.न.पा.आस्थापनेवरील पात्र उमेदवार श्री.अजय सदाशिव नहिरे यांची स्ट्रक्चरल डिझायनर या पदासाठी र.रु. १५६००-३९१००, ग्रेड वेतन ५४०० या वेतनश्रेणीत नेमणूक करावी”, असा प्रस्ताव ठेवणेत आला आहे त्यास मान्यता देणेत येत आहे.

भारतीय प्रजासत्ताकाच्या सुवर्ण महोत्सव वर्षानिमित्त म.न.पा. मुख्य शासकिय इमारतीच्या दर्शनी भागात तसेच यशवंतराव सभागृहात भारतीय संविधानाची प्रस्ताविका (सरनामा) भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १४ एप्रिल २०१० जयंतीचे औचित्य साधून बसविण्यास मान्यता देणेत येत आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय ७५० बेडस् असलेले मल्टीडिसिप्लेनरी, पब्लिक हॉस्पीटल कार्यरत आहे. आरोग्य सेवा अंतर्गत रुग्णालयीन सेवत म.न.पा.परिसर तसेच जवळपासचे सर्व जिल्हयामधुन या ठिकाणी दररोज हजारो रुग्ण औषध उपचार घेत आहेत. रुग्णालयात बाहय रुग्ण विभागामध्ये ८ओ.पी.डी.,१५अंतररुग्ण विभाग, ८ऑपरेशन थिएटर असलेले शस्त्रक्रिया संकुल, **ECU,SDICU,NICU**, डायलिसीस विभाग, कॅन्सर विभाग, कृत्रिम अवयव विभाग, औषधवाटप विभाग, तातडीक औषध वाटप विभाग, रुग्णालय औषध भांडार, रुग्णालय

भांडार, बायोमेडिकल विभाग इत्यादी कार्यरत आहेत. या सर्व विभागांना रुग्णालय औषध भांडारामार्फत दैनंदिन आवश्यक लागणारे औषधे /साहित्य, लॅब केमिकल्स, एक्स रे फिल्मस्, डेंटल साहित्य व इतर यांचा पुरवठा केला जातो. दिवसेंदिवस रुग्ण संख्या वाढत असल्याने रुग्णास लागणारे औषध/साहित्य, प्रयोगशाळा केमिकल्स,एक्स रे फिल्मस् व इतर साहित्य यांची मागणी, खरेदी,वाटप इत्यादी कामकाजाचा व्याप वाढलेला आहे. परिणामी या रुग्णालयाचे औषध भांडारामध्ये व्यवस्थापक या पदाची नितांत आवश्यकता भासत आहे. या सर्व बाबी विचारात घेता वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये सुध्दा औषध भांडार आहे. तेथील कामकाजाचा व्याप हा मध्यवर्ती औषध भांडारातील "व्यवस्थापक मध्यवर्ती औषध भांडार" यांच्या पदाइतकाच महत्वाचा व जबाबदारीचा झालेला आहे. वाय.सी.एम.रुग्णालयातील सर्व विभागांना योग्य रितीने व तत्परतेने औषधे /साहित्य यांची व्यवस्था होण्यासाठी अनुभवी व्यवस्थापक असण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. रुग्णालयीन कामकाजाच्या व्यवस्थापनाच्या दृष्टिने महानगरपालिकेचे आस्थापनेवरील फार्मासिस्ट पे बँड र.रु.९३००-३४८०० ग्रेड वेतन ४२०० या संवर्गाचे एका पदाची श्रेणीवाढ करुन "व्यवस्थापक औषध भांडार,वाय.सी.एम.रुग्णालय" या अभिनामाचे एक पद

१. एस.एस.सी.किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण
२. वैद्यकीय महाविद्यालयातील फार्मसीमधील पदविकाधारक
३. किमान २५० बेडस् असलेल्या रुग्णालयाचे औषध भांडारातील सर्व कामकाजाचा किमान १० वर्ष अनुभव

याप्रमाणे अर्हता निश्चित करुन पे बँड र.रु.९३००-३४८००,ग्रेड वेतन ४४०० या वेतनश्रेणीमध्ये निर्माण करुन फार्मासिस्ट या पदावरील कर्मचाऱ्यांमधुन पदोन्नतीने भरणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-६० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ९

दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अति/२/कावि/४१/२०१०

दि.१०.०२.२०१०

२) मा.महापालिका सभा ठराव क्र.८२६ दि.२०/०२/२०१० अन्वये

विषय :- अनाधिकृत बांधकाम केलेल्या नगरसदस्यावर मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम १२ अन्वये न्यायालयात संदर्भ करण्यासाठी परवानगी मिळणेबाबत-

श्री.संभाजी बारणे यांनी माहितीच्या अधिकारात करसंकलन विभागाकडून मिळविलेल्या माहितीप्रमाणे पिंपरी चिंचवड महापालिकेचे २५ नगरसदस्य/नगरसदस्या अनाधिकृत बांधकामाशी निगडीत असुन अशा नगरसदस्यावर कारवाई करण्यासाठीची विनंती महाराष्ट्र शासनाकडे करण्यात आली होती. शासनाने मनपा आयुक्ताकडे हे अर्ज चौकशीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविले आहे.

या अर्जाच्या चौकशीकामी सर्व नगरसेवकांना कारणे दाखवा नोटीसा बजावून त्यांचा त्या संदर्भात खुलासा मागविणेत आला होता. त्यात काही नगरसदस्याचा खुलासा समाधान कारक असुन काही नगरसेवकांनी मात्र अनाधिकृत बांधकामे केलेली आहेत./ होती. असे प्रथम दर्शनी दिसुन येत आहे. अनाधिकृत बांधकामे गुंठेवारी कायद्यानुसार नियमानुकुल झालेली असली तरी त्यामुळे अशा नगरसेवकांवर अपात्रता सिध्द होते वा नाही ही बाब न्यायालयाकडे संदर्भ करुनच खात्री करणे शक्य आहे.

तसेच काही नगरसेवकांनी आपले खुलाशात सदरची मालमत्ता / बांधकामे आपले नसुन आपले वडिल / आई / इतर नातेवाईक यांचे आहेत असे आपल्या खुलाशात नमुद केलेले आहे व त्याप्रमाणे करसंकलन विभागाकडे दुरुस्त नोंदीचे कागदपत्र सादर केलेले आहेत. तथापि संबंधित नगरसेवकांनी निवडणूक नामनिर्देशन पत्र भरतेवेळी केलेले मालमत्ता विषयक प्रतिज्ञापत्र पाहता सदरची मालमत्ता त्यांनी त्यांचे नावे असल्याचे प्रतिज्ञापत्रात नमुद केलेले आहे. अशा प्रसंगी संबंधित नगरसेवक अपात्र होईल वा कसे याचा न्यायालयांनी निर्णय देणे योग्य राहील व त्यासाठी न्यायालयाकडे संदर्भ करणे गरजेचे आहे.

या पार्श्वभूमीवर उक्त अधिनियमाचे कलम १२ प्रमाणे नगरसदस्यांनी केलेल्या अनाधिकृत बांधकामाविषयी वाद उत्पन्न झाला असल्याने त्याविषयी न्यायाधिशांकडून निर्णय प्राप्त करुन घेणे आवश्यक झालेले आहे. तथापि कलम १२ तील तरतुदीप्रमाणे असा संदर्भ न्यायालयाकडे करण्यासाठी सभागृहाने आयुक्तांना निर्देश देणे/विनंती करणे आवश्यक आहे. यास्तव सदरील विषयपत्र दि.१७/०३/२००८ रोजी मा.महापालिका सभेपुढे ठेवणेत आले होते. तथापि महापालिका सभा ठराव क्रमांक ६५३ दि.०३/०६/२००९ अन्वये सदर विषयाबाबतचा विचार दि.१९/०६/२०१० चे सभेचेवेळी करणेत यावा असा निर्णय झाला.

मा.उपसचिव, नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.२०/०१/२०१० चे पत्रामध्ये नमुद केलेप्रमाणे पिंपरी चिंचवड शहरातील अनाधिकृत बांधकामे असणाऱ्या नगरसेवकांचे पद रद्द करणेबाबत मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४४८ चा विचार करता कलम ४४८ नुसार याप्रकरणी हे आदेश प्राप्त झालेपासुन ३० दिवसात सदरचा विषय महासभेपुढे ठेवून अधिनियमातील तरतुदीप्रमाणे निर्णय घेण्यात यावा असे निदेश दिलेले आहेत.

तरी सदरील शासनाकडील पत्राच्या अनुषंगाने सदरचा विषय मा.महापालिका सभेपुढे निर्णयार्थ ठेवणेत यावा.

उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव मा.आयुक्त यांजकडुन आला असल्याने त्याप्रमाणे त्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

मा.राजेंद्र साळुंके :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.हरिभाऊ तिकोने :- सूचनेला अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- ८३६ विषय क्रमांक :- ९
दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अति/२/कावि/४१/२०१० दि.१०.०२.२०१०
२) मा.महापालिका सभा ठराव क्र.८२६ दि.२०/०२/२०१० अन्वये

विषय क्रमांक ९चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-६० प्रतिकूल-०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८३७ विषय क्रमांक :- १०
दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.नगरसचिव

मा.विधी समिती

अ) दि.१८/१२/०९ व १/१/१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दि.१/१/१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-६० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

मा.महिला व बालकल्याण समिती

ठराव क्रमांक :- ८३८ विषय क्रमांक :- ११
दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.नगरसचिव

दि.१३/१/१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-६० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८३९ विषय क्रमांक :- १२

दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.नगरसचिव

मा.झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाजकल्याण समिती

अ) दि.१६/१२/०९,२३/१२/०९ व ६/१/१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.२०/१/१०, ३/२/१० व १०/२/१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दि.३/२/१० व १०/२/१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता

अनुकूल-६० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८४० विषय क्रमांक :- १३

दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.नगरसचिव

मा.क्रिडा समिती

दि.२०/१/१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-६० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १४

दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) सन्मा.नगरसदस्या स्मिता गुंजेकर यांचेकडील पत्र दि.१३/१/२०१०

२) मा.ब प्रभाग समितीकडील ठराव क्र.१६५ दि.२०.१.२०१०

विषय- मुंबई-पुणे रेल्वेच्या कडेने गोकुळ हॉटेल पर्यंत रस्त्यासाठी जागा ताब्यात घेणेबाबत

मुंबई-पुणे रस्त्यावरुन पिंपरीकडे जाणाऱ्या रस्त्यावर आर.ओ.बी. बांधण्यात आलेला आहे. सदरच्या रस्त्यावर नागरिक व वाहतुक यांची वर्दळ मोठ्या प्रमाणावर वाढली असल्याने त्या ठिकाणी नेहमी वाहतुकीचा खोळंबा होतो. याकरीता पिंपरी येथे जाणेकरीता आर.यु.बी. करण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे नागरिकांची वाहतुक सोयीची होणार आहे.

तरी सदर आर.यु.बी. साठी मुंबई-पुणे रस्त्यापासून स.नं.२०१ व २०२ मधून जाणारा दक्षिणोत्तर सध्याचा रेल्वे लाईन पर्यंतचा रस्ता म.न.पा.ने ताब्यात घ्यावा. तसेच गोकुळ हॉटेल पासून रेल्वे लाईनकडे येणाऱ्या ९.०० मी. डी.पी.रस्त्याचे दक्षिण टोका पासून पुढे रेल्वे लाईनच्या कडेने पूर्वेकडे जाणारा ९.०० मी. रुंदीचा स.नं.२०१ व २०२ मधील रस्त्यापर्यंतचा रस्ता करणेस जागा ताब्यात घेणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महापालिका सर्वसाधारण सभेने ठराव क्रमांक ५७११, दिनांक ०३/०२/२००६ अन्वये मंजूर विकास योजनेतील मौजे रावेत येथील स.नं.१५४,१७९ इत्यादि मिळकतींमध्ये प्रस्तावित केलेले १८.०० मी. व २४.०० मी. रुंद रस्त्यांची रुंदी ४५.०० मी. व ३०.०० मी. करण्यास व त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सर्व वैधानिक कार्यवाही करण्यास मान्यता दिलेली आहे. सदर ठरावाच्या अनुषंगाने जाहिर नोटीस प्रसिद्ध करुन नागरिकांच्या हरकती सूचना मागविण्यात येऊन त्यांना सुनावणी देण्यात आली आहे. आता सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे पाठविणेकामी मान्यता देणेत यावी.

मा.उल्हास शेट्टी :- उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.तानाजी खाडे :- उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- ८४१ विषय क्रमांक :- १४
दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) सन्मा.नगरसदस्या स्मिता गुंजेकर यांचेकडील पत्र दि.१३/१/२०१०
२) मा.ब प्रभाग समितीकडील ठराव क्र.१६५ दि.२०.१.२०१०

विषय- मुंबई-पुणे रेल्वेच्या कडेने गोकुळ हॉटेल पर्यंत रस्त्यासाठी जागा ताब्यात घेणेबाबत

मुंबई-पुणे रस्त्यावरुन पिंपरीकडे जाणाऱ्या रस्त्यावर आर.ओ.बी. बांधण्यात आलेला आहे. सदरच्या रस्त्यावर नागरिक व वाहतुक यांची वर्दळ मोठ्या प्रमाणावर वाढली असल्याने त्या ठिकाणी नेहमी वाहतुकीचा खोळंबा होतो. याकरीता पिंपरी येथे जाणेकरीता आर.यु.बी. करण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे नागरिकांची वाहतुक सोयीची होणार आहे.

तरी सदर आर.यु.बी. साठी मुंबई-पुणे रस्त्यापासून स.नं.२०१ व २०२ मधून जाणारा दक्षिणोत्तर सध्याचा रेल्वे लाईन पर्यंतचा रस्ता म.न.पा.ने ताब्यात घ्यावा. तसेच गोकुळ हॉटेल पासून रेल्वे लाईनकडे येणाऱ्या ९.०० मी. डी.पी.रस्त्याचे दक्षिण टोका पासून पुढे रेल्वे लाईनच्या कडेने पूर्वेकडे जाणारा ९.०० मी. रुंदीचा स.नं.२०१ व २०२ मधील रस्त्यापर्यंतचा रस्ता करणेस जागा ताब्यात घेणेस मान्यता देणेत येत आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महापालिका सर्वसाधारण सभेने ठराव क्रमांक ५७११, दिनांक ०३/०२/२००६ अन्वये मंजूर विकास योजनेतील मौजे रावेत येथील स.नं.१५४,१७९ इत्यादि मिळकतींमध्ये प्रस्तावित केलेले १८.०० मी. व २४.०० मी. रुंद रस्त्यांची रुंदी ४५.०० मी. व ३०.०० मी. करण्यास व त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सर्व वैधानिक कार्यवाही करण्यास मान्यता दिलेली आहे. सदर ठरावाच्या अनुषंगाने जाहिर नोटीस प्रसिद्ध करुन नागरिकांच्या हरकती सूचना मागविण्यात येऊन त्यांना सुनावणी देण्यात आली

आहे. आता सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे पाठविणेकामी मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-६०　　　　　　　　　　　　प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १५

दिनांक :- २०.३.२०१०　　　　　　　　विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.खेडकर घनशाम रामचंद्र व मा.लांडगे सारिकाताई संतोषभाऊ यांचा दि.६/१/२०१० चा प्रस्ताव
२) मा.क प्रभाग समितीकडील ठराव क्र.१३७४ दि.६/१/२०१०
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.८२४ दि.२०/०२/२०१० अन्वये

विषय :- मौजे चऱ्होली स.नं.४१४ (४७०) मध्ये कुस्ती आखाडा हे आरक्षण प्रस्तावित करणेबाबत- (महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये)

मौजे चऱ्होली येथील स.नं.४१४ (४७०) पै मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन हद्दवाढीच्या विकास योजनेत बैलगाडा शर्यत घाटाचे शेजारी निवासी विभाग दर्शविण्यात आला आहे. सदर जागेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये ०.५० हेक्टर क्षेत्रात कुस्ती आखाडा हे आरक्षण प्रस्तावित करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देतो.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्यातील आ.क्र.९१ या उद्यानासाठी आरक्षित असलेल्या एकूण क्षेत्र ३.०९ हेक्टर जागेपैकी अंदाजे ५०% जागेवर मनपाने यापुर्वीच उद्यान विकसित केले आहे. तथापि, उर्वरीत क्षेत्रावर "ट्रॅफिक पार्क" उभारण्याचे मनपाचे नियोजन असून त्यासाठी बराच खर्च येणार आहे. मनपाची सध्याची आर्थिक स्थिती लक्षात घेता सदरचा ट्रॅफिक पार्क उभारण्याचा प्रकल्प बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (बी.ओ.टी.) पद्धतीने करणे गरजेचे आहे. सबब, सदरच्या आ.क्र.९१ वरील अविकसित जागेवर बी.ओ.टी. तत्वावर ट्रॅफिक पार्क विकसित करणे शक्य होणेसाठी या आरक्षणास लागून असलेल्या २४ मी. व १२ मी. रस्त्यालगतचे अंदाजे दहा टक्के क्षेत्र व्यापारी उपयोगासाठी वापरणेसाठी सदर आरक्षणाच्या उपयोगाच्या फेरबदलास म.प्रा. व न.रा. अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी.

मा.प्रेमकुमार नायर :- उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.शंकर जगताप :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

मोरे वस्ती या भागातील प्राथमिक शाळा आरक्षण क्र.PS १/१०६ या जागेवर नागरीकांची घरे झालेमुळे मौजे चिखली मधील गट क्र. १४४५,१४४६ व १४५३ मधिल प्राथमिक शाळा आरक्षण क्र. (PS १/१०६) हे आरक्षण या गटांमध्ये न घेता अन्य ठिकाणी स्थलांतरीत करणे अथवा रद्द करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही प्रस्तावित करुन त्यास शासन मान्यता घेण्याची पुढील कार्यवाही प्रशासनाने करणेस मान्यता देणेत यावी. गट क्र.१२९७ मधिल जागा पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने अन्य कारणासाठी आरक्षित केली असल्यामुळे मौजे चिखली मधील गट क्र. १२९४,१२९७,१३०३, १३०४,१३०५ व १३०७ मधील गार्डन (आरक्षण क्र. G १/१०८) चे आरक्षण हे या गटांमध्ये न घेता अन्य ठिकाणी स्थलांकरीत करणे अथवा रद्द करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही प्रस्तावित करुन त्यास शासन मान्यता घेण्याची पुढील कार्यवाही प्रशासनाने करणेस मान्यता देणेत यावी.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मोशी येथील गट नं. जुना ४६५ व नविन ४६७ या ठिकाणी गांव जत्रेसाठी बैलगाडा घाट व कुस्ती आखाडा हे आरक्षण टाकणेस मान्यता देणेत यावी.

मा.दत्तात्रय साने :- उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब,मा.शंकर जगताप व मा.दत्तात्रय साने यांनी मा.भाऊसाहेब भोईर व मा.प्रेमकुमार नायर यांनी मांडलेली उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- ८४२ विषय क्रमांक :- १५
दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.खेडकर घनशाम रामचंद्र व मा.लांडगे सारिकाताई संतोषभाऊ यांचा दि.६/१/२०१० चा प्रस्ताव
२) मा.क प्रभाग समितीकडील ठराव क्र.१३७४ दि.६/१/२०१०
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.८२४ दि.२०/०२/२०१० अन्वये

विषय :- मौजे चऱ्होली स.नं.४१४ (४७०) मध्ये कुस्ती आखाडा हे आरक्षण प्रस्तावित करणेबाबत-(महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये)

मौजे चऱ्होली येथील स.नं.४१४ (४७०) पै मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन हद्दवाढीच्या विकास योजनेत बैलगाडा शर्यत घाटाचे शेजारी निवासी विभाग दर्शविण्यात आला आहे. सदर जागेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये ०.५० हेक्टर क्षेत्रात कुस्ती आखाडा हे आरक्षण प्रस्तावित करण्यास मान्यता देणेत येत आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्यातील आ.क्र.९१ या उद्यानासाठी आरक्षित असलेल्या एकूण क्षेत्र ३.०९ हेक्टर जागेपैकी अंदाजे ५०% जागेवर मनपाने यापुर्वीच उद्यान विकसित केले आहे. तथापि, उर्वरीत क्षेत्रावर “ट्रॅफिक पार्क” उभारण्याचे मनपाचे नियोजन असून त्यासाठी बराच खर्च येणार आहे. मनपाची सध्याची आर्थिक स्थिती लक्षात घेता सदरचा ट्रॅफिक पार्क उभारण्याचा प्रकल्प बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (बी.ओ.टी.) पद्धतीने करणे गरजेचे आहे. सबब, सदरच्या आ.क्र.९१ वरील अविकसित जागेवर बी.ओ.टी. तत्वावर ट्रॅफिक पार्क विकसित करणे शक्य होणेसाठी या आरक्षणास लागून असलेल्या २४ मी. व १२ मी. रस्त्यालगतचे अंदाजे दहा टक्के क्षेत्र व्यापारी उपयोगासाठी वापरणेसाठी सदर आरक्षणाच्या उपयोगाच्या फेरबदलास म.प्रा. व न.रा. अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

मोरे वस्ती या भागातील प्राथमिक शाळा आरक्षण क्र.PS १/१०६ या जागेवर नागरीकांची घरे झालेमुळे मौजे चिखली मधील गट क्र. १४४५,१४४६ व १४५३ मधिल

प्राथमिक शाळा आरक्षण क्र. (PS १/१०६) हे आरक्षण या गटांमध्ये न घेता अन्य ठिकाणी स्थलांतरीत करणे अथवा रद्द करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही प्रस्तावित करुन त्यास शासन मान्यता घेण्याची पुढील कार्यवाही प्रशासनाने करणेस मान्यता देणेत येत आहे.

गट क्र.१२९७ मधिल जागा पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने अन्य कारणासाठी आरक्षित केली असल्यामुळे मौजे चिखली मधील गट क्र. १२९४,१२९७,१३०३, १३०४,१३०५ व १३०७ मधील गार्डन (आरक्षण क्र. G १/१०८) चे आरक्षण हे या गटांमध्ये न घेता अन्य ठिकाणी स्थलांकरीत करणे अथवा रद्द करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही प्रस्तावित करुन त्यास शासन मान्यता घेण्याची पुढील कार्यवाही प्रशासनाने करणेस मान्यता देणेत येत आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मोशी येथील गट नं. जुना ४६५ व नविन ४६७ या ठिकाणी गांव जत्रेसाठी बैलगाडा घाट व कुस्ती आखाडा हे आरक्षण टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ६० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८४३ विषय क्रमांक :- १६
दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.आयुक्त यांजकडील क्र.नरवि/कावि/२ब/दिघी/१०५/०९, दि.८/१२/२००९ चा प्रस्ताव
२) मा.क प्रभाग समितीकडील ठराव क्र.१३५६ दि.६.१.२०१०

विषय :- मौजे दिघी येथील नविन हद्दीवाढीच्या भागशः विकास योजनेतील स.नं.२ व ३ मधील संरक्षण खात्याच्या हद्दीलगत असलेल्या १५.० मी. रस्ता स्थलांतरीत करणेबाबत-
(महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नविन हद्दवाढीच्या भागशः मंजूर विकास योजनेत मौजे दिघी येथील स.नं.२ व ३ मध्ये संरक्षण हद्दीस लागून विकास योजनेत १५.० मी. रस्ता प्रस्तावित करण्यात आलेला आहे. तथापि सदर रस्त्याचे आखणीमध्ये

माजी सैनिकांची घरे बाधीत होत आहेत. परंतु सदर घरांच्या समोर अस्तित्वातील रस्ता असून विकास योजनेतील १५.० मी. रस्ता हा सदर अस्तित्वातील रस्त्यास प्रस्तावित केल्यास संरक्षण हद्दीस लागून असलेल्या नागरिकांची घरे वाचतील.

सबब स.नं.२ व ३ मधील संरक्षण हद्दीस लागून असलेला १५.० मी. रस्ता स्थलांतरीत करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये विकास योजनेत फेरबदल करणेकामी विषयपत्र ठेवण्यात आले आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नविन हद्दवाढीच्या भागशः मंजूर विकास योजनेत मौजे दिघी येथील स.नं.२ व ३ मध्ये संरक्षण हद्दीस लागून विकास योजनेत १५.० मी.रस्ता प्रस्तावित करण्यात आलेला आहे. तथापि सदर रस्त्याचे आखणीमध्ये माजी सैनिकांची घरे बाधीत होत आहेत. परंतु सदर घराच्या समोर अस्तित्वातील रस्ता असून विकास योजनेतील १५.० मी.रस्ता हा सदर अस्तित्वातील रस्त्यास प्रस्तावित केल्यास संरक्षण हद्दीस लागून असलेल्या नागरिकांची घरे वाचतील. तसेच सदर रस्त्याचे आखणीत होणाऱ्या फेरबदलामुळे रस्त्यालगत असणारी आरक्षणाचे हद्दीत देखील फेरबदल करणे आवश्यक आहे. सबब महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये भागशः मंजूर विकास योजनेत फेरबदल करणेकामी तसेच सदर फेरबदलाचे अनुषंगाने प्राप्त हरकतीसह प्रस्तुतचा फेरबदलचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ६० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८४४ विषय क्रमांक :- १७
दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) क्र.नरवि/कावि/रहाटणी/४१/२०१०, दिनांक २५/१/२०१० रोजीचा मा.आयुक्त साहेब यांचा प्रस्ताव
२) मा.ड प्रभाग समितीकडील ठराव क्र.१३३ दि.११.२.२०१०

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग अधिसुचना क्र.टिपीएस-१८९३/१४१२/युडी-१३, दिनांक २८ नोव्हेंबर, १९९५ अन्वये मंजूर विकास आराखड्यातील तसेच पिंपरी चिंचवड नवनगर

विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेतील वगळलेल्या भागाची विकास योजना महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील अधिसुचना क्र.टिपीएस/१८९३/१४१२/युडी-१३, दिनांक २८ डिसेंबर, १९९९ अन्वये मंजूर झालेली आहे. सदर विकास आराखड्यातील काही भाग महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग अधिसुचना क्र.पीसीएन-१६९७/९३४/प्र.क्र.८९/नवि-२२, मंत्रालय मुंबई दिनांक १५ नोव्हेंबर, १९९७ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेमध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहे. त्यापैकी मौजे-रहाटणी येथील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेमधील खालील तक्त्यात दर्शविलेल्या प्रस्तावित रस्त्यांचे भूसंपादन त्वरीत करणेकामी स्थानिक प्रतिनिधींनी मागणी केलेल्या खालील रस्त्याचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | रस्ता रुंदी | रस्त्याचे नांव | स.नं. | क्षेत्र हे.आर. | अंदाजे खर्च (कोटीमध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| १. | १८ मीटर रस्ता | रहाटणी पवनानगर मधील प्रस्तावित ४५.०० मी. ते रहाटणी-पिंपरी जुना पुल जोडणारा प्रस्तावित १८.०० मी. प्रस्तावित रस्ता | स.नं.९९ ते १०६ पै १०८ ते १११ पै. | १.५० | ९.७५ |
| २. | १८.०० मी रस्ता | रहाटणी-पिंपरी जुना पुल ते रहाटणी पिंपरी नविन (महादेव मंदिर पुल) पुलापर्यंत जोडणारा प्रस्तावित १८.०० मी. प्रस्तावित रस्ता | स.नं.१११ ते ११२, ११६, १२० ते १२२ पै. | १.५५ | १०.१० |
| ३. | १८.०० | रहाटणी पिंपरी नविन पुल (महादेव मंदिर पुल) ते रहाटणी मनपा शाळेपर्यंत जोडणारा प्रस्तावित १८.०० मी. प्रस्तावित रस्ता | स.नं.१२२ ते १२३ व १२५, १३०, १२९ ५०,४५ व ४३ पै | १.६२ | १२.१५ |

उपरोक्त प्रस्तावित रस्त्याखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ चे भूसंपादन अधिनियम, १८९४ अन्वये संपादन करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ६०                                                    प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८४५                                    विषय क्रमांक :- १८
दिनांक :- २०.३.२०१०                                    विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.कमल कलाटे यांचा दिनांक ५/२/२०१० रोजीचा प्रस्ताव
२) मा.ड प्रभाग समितीकडील ठराव क्र.१३५ दि.११.२.२०१०

कस्पटेवस्ती स्मशानभूमीपासून वाकड फ्लायओव्हर ते पारखेवस्ती (मनपा हद्दीपर्यंत) हा रस्ता विकास आराखड्यामध्ये ४५.०० मी.रुंदीचा आहे. पारखेवस्तीपासून पुढे हिंजवडीकडे जाणारा एम.आय.डी.सी.च्या मालकीचा रस्ता हा ३०.०० मी.रुंदीचा आहे. वाकड फ्लायओव्हर पासून पारखेवस्तीपर्यंत रस्ता ४५.०० मी. ऐवजी ३०.०० मिटर केल्यास येथील नागरीकांचे नुकसान होणार नाही.

तरी वाकड उड्डाणपुलापासून पारखेवस्तीपर्यंतचा रस्ता ४५.०० मी. ऐवजी ३०.०० मी. करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-६०                                                    प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १९
दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.सिध्देश्वर बारणे यांचा दिनांक ५/२/२०१० रोजीचा प्रस्ताव
२) मा.ड प्रभाग समितीकडील ठराव क्र.१३७ दि.११.२.२०१०

मौजे-थेरगांव येथील स.नं.२९ पैकी या मिळकतीमध्ये आ.क्र.६२७ ब प्रसुतीगृह व दवाखाना या प्रयोजनाचे आरक्षण प्रस्तावित केलेले आहे. सदर आरक्षणाचे क्षेत्र ४० आर आहे.

स.नं.२९ पैकी या मिळकतीमध्ये यापुर्वीच आरक्षण क्र.६२४ प्राथमिक शाळा व तीन रस्तारुंदी प्रस्तावीत केलेले आहेत. त्यामुळे सदर शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे. त्यामुळे आता नव्याने प्रस्तावित केलेले आरक्षण क्र.६२७ब प्रसुतीगृह व दवाखाना हे आरक्षण वगळणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

मौजे वाकड हद्दीतील थेरगाव वाकड हद्दीतील ४५.०० मी. रस्ता रुंदी २४.०० मी. रुंदीप्रमाणे करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास मा.महापालिका सभा ठराव क्र.४२६, दि.१८/०८/२००८ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर ठरावानुसार कार्यवाही पुर्ण करुन प्रस्ताव मान्यतेकामी शासनास सादर करणेस मान्यता देणेत यावी.

मा.उल्हास शेट्टी :- उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.विनायक रणसुभे :- उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- ८४६ विषय क्रमांक :- १९
दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.सिध्देश्वर बारणे यांचा दिनांक ५/२/२०१० रोजीचा प्रस्ताव
२) मा.ड प्रभाग समितीकडील ठराव क्र.१३७ दि.११.२.२०१०

मौजे-थेरगांव येथील स.नं.२९ पैकी या मिळकतीमध्ये आ.क्र.६२७ ब प्रसुतीगृह व दवाखाना या प्रयोजनाचे आरक्षण प्रस्तावित केलेले आहे. सदर आरक्षणाचे क्षेत्र ४० आर आहे.

स.नं.२९ पैकी या मिळकतीमध्ये यापुर्वीच आरक्षण क्र.६२४ प्राथमिक शाळा व तीन रस्तारुंदी प्रस्तावीत केलेले आहेत. त्यामुळे सदर शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे. त्यामुळे आता नव्याने प्रस्तावित केलेले आरक्षण क्र.६२७ब प्रसुतीगृह व दवाखाना हे आरक्षण वगळणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

मौजे वाकड हद्दीतील थेरगाव वाकड हद्दीतील ४५.०० मी. रस्ता रुंदी २४.०० मी. रुंदीप्रमाणे करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास मा.महापालिका सभा ठराव क्र.४२६, दि.१८/०८/२००८ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर ठरावानुसार कार्यवाही पुर्ण करुन प्रस्ताव मान्यतेकामी शासनास सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ६० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.महापौर :- सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

(योगेश मंगलसेन बहल )
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/१३८/१०
दिनांक :- ५/४/२०१०

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.